( 1 ) मोटार अपघात प्रकरण क्र. २०१/२०२३
अश्विनी वि.बालाजी व इतर
नि.क्र. १८ **CW-1**

**<u>अर्जदारातर्फे शपथेवर पुढील सरतपास ॲडव्होकेट श्री. एम.बी. जाधव</u>**

८. मी सदर प्रकरणात पोलीस पेपर्स दाखल केले आहेत. एफ.आय.आर. ची कॉपी **नि.क्र. १९** वर आहे. फिर्याद **नि.क्र. २०** वर आहे. घटनास्थळ पंचनामा **नि.क्र. २१** वर आहे. आकस्मिक मृत्युची खबर **नि.क्र. २२** वर आहे. श्वविच्छेदन अहवाल **नि.क्र. २३** वर आहे. यांत्रिकी निरीक्षण अहवाल **नि.क्र. २४** वर आहे. चार्जशिट **नि.क्र. २५** वर आहे. एम.एल.सी. **नि.क्र. २६** वर आहे. साक्षीदारांचे जबाब एकत्रीतरित्या **नि.क्र. २७** वर आहे. मरणोत्तर पंचनामा **नि.क्र. २८** वर आहे. इन्शुरन्स पॉलीसी **नि.क्र. २९** वर आहे. आरसी बुक **नि.क्र. ३०** वर आहे. अर्जदाराचे आधार कार्डची प्रत **नि.क्र. ३१** वर आहे. मयताचे आधारकार्डची प्रत **नि.क्र. ३२** वर आहे.

गैरअर्जदार व त्यांचे वकिल गैरहजर, न्यायार्थ उलटतपास पुढील तारखेपर्यंत स्थगित

श्रवणोत्तर स्वीकृत,

( विद्याधर शे. मोरे )

दिनांक :-१६/०२/२०२६ सदस्य

मोटार अपघात प्राधिकरण, लातूर

**<u>शपथेवर उलटतपास गैरअर्जदार क्र.१ व २ तर्फे ॲडव्होकेट श्री. अजिंक्य परशेट्टी</u>**

९. गैरअर्जदार क्र.१, २ व त्यांचे वकिल गैरहजर, सबब उलटतपास नाही.

**<u>गैरअर्जदार क्र.३ तर्फे ॲडव्होकेट श्री. एस.जी. डोईजोडे</u>**

१०. मी अपघाताची घटना प्रत्यक्ष पाहिली नाही. त्यादिवशी माझे पती तांदुळजाहून लातूर येथे आले होते. ते मोटारसायकलवर एकटेच होते. घटना वांजरखेडापाटीजवळ घडली असे मला नंतर कळाले. घटना रात्री १०.३० च्या सुमारास घडली. त्यावेळी मी माझे गावी तांदुळजा येथे होते. माझ्या दिराने मला घटनेबाबत सांगितले. मला माहिती मिळताच मी घटनेच्या ठिकाणी वांजरखेडा पाटी येथे गेले. तेथून आम्ही माझ्या पतीला शासकीय दवाखाना लातूर येथे आणले. दवाखान्यामध्ये पोलीस चौकी आहे. मी त्याचदिवशी दवाखान्यातील पोलीस चौकीमध्ये माझ्या पतीला ट्रॅक्टरने धडक दिली म्हणून तक्रार दिली नाही. मी साधारण २५ दिवसानंतर गातेगांव पोलीस स्टेशनला तक्रार दिली. मी माझ्या पतीला सरकारी दवाखान्यात घेऊन गेले तेंव्हा मला धडक देणा–या ट्रॅक्टरचा नंबर माहिती होता. माझे दीर पण सरकारी दवाखान्यात होते. माझ्या दिरानेही तक्रार दिली नाही. अपघाताच्या दिवशीच माझे पती वारले. गातेगांव हे आमच्या गावापासून २० त २५ किमी आहे. सरकारी दवाखान्यातील डॉक्टरने पोलीसांना कळवले होते. हे म्हणणे खरे नाही की, ट्रॅक्टर मालक व चालक यांच्याशी संगनमत करुन ट्रॅक्टरला खोटेपणे अपघातात गोवले आहे. प्रताप पंडीत माझे दीर आहेत. मी घटनास्थळ पंचनामा वाचला आहे. पंचनाम्यामध्ये ट्रॅक्टरचा नंबर लिहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीचा मृत्यु ट्रॅक्टरने धडक दिल्याने झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगते की दि.११/०१/२०२३ रोजी रात्री १०.३० च्या सुमारास ट्रॅक्टर क्र. एम.एच.४४/झेड–१२१७ च्या चालकाने ट्रॅक्टर वेगात, निष्काळजीपणे चालवून माझ्या पतीच्या मोटारसायकलला धडक दिली. मी जेंव्हा अपघाताची

माहिती मिळाल्यावर घटनास्थळी गेले त्यावेळी तेथे ट्रॅक्टर होता. त्यावेळी मी ट्रॅक्टरचा नंबर पाहिला होता. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही पोलीसांशी संगनमत करुन ट्रॅक्टर चालकाच्या विरुद्ध खोटा गुन्हा करायला लावला. हे म्हणणे खरे नाही की, आम्हीच साक्षीदार पुरवले आणि पोलीसांनी खोटा तपास करुन खोटे आरोपपत्र दाखल केले.

११. माझ्या पतीने ज्वेलर्सच्या दुकानात किती भांडवल गुंतवले होते याचे रेकॉर्ड दाखल केले नाही. माझ्या पतीने व्यवसायासाठी खरेदी केलेल्या सोन्या चांदीच्या पावत्या मी दाखल केलेल्या नाहीत. माझे पती टॅक्स भरत होते. तसे टॅक्सचे रिटर्नस मी दाखल केले नाहीत. माझ्या पतीने सोन्या चांदीचे दागिने विक्री केलेल्या पावत्या मी दाखल केलेल्या नाहीत. माझे पती महिन्याला ५० ते ६० हजार रुपये कमवत होते हे दाखविण्यासाठी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. सोन्या चांदीच्या दुकानातील खाते उतारा दाखल केला नाही. माझ्या पतीने व्यवसायाच्या उत्पन्नातून मालमत्ता खरेदी केल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगते की माझ्या पतीचे उत्पन्न दरमहा ५० ते ६० हजार रुपये होते. माझ्या पतीने ज्वेलर्सच्या व्यवसायासाठी लायसन्स काढले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने केवळ कागदोपत्री लायसन्स काढले होते आणि ते प्रत्यक्षत ते तसा व्यवसाय करत नव्हते. मी माझ्या पतीचे लायसन्स दाखल करु शकते.

१२. माझे पतीचे सातवीपर्यंत शिक्षण झाले होते. मी माझ्या पतीचे शाळेतील प्रमाणपत्र दाखल करु शकते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीचे वय ३९ नव्हते आणि ते कमी दाखवले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नुकसान भरपाईची खोटी मागणी केलेली आहे आणि ते नुकसान भरपाई देण्यास विमा कंपनी बांधील नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीकडे वाहन चालवण्याचा परवाना नव्हता. मी तसा परवाना दाखल करु शकत नाही. तसा परवाना पतीने कोणत्या ऑफीसमधून

काढला होता हे मला माहिती नाही. अपघाताच्या वेळी माझ्या पतीच्या डोक्यावर हेल्मट नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दिले आहे व खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.

Digitally signed by VIDYADHAR SHESHARAO MORE
Date: 2026.04.30 16:51:32 +0530

( विद्याधर शे. मोरे )

दिनांक :-३०/०४/२०२६

सदस्य

मोटार अपघात प्राधिकरण, लातूर